**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०३ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस; मराठवाड्यात सर्वाधिक तर कोकणात सर्वात कमी उमेदवार रिंगणात.**
2. **भाजपचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील असा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास.**
3. **कापसाच्या आयातीवर तात्काळ बंदी घालून हमी भावाने कापूस खरेदी करण्याची काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे पत्राद्वारे मागणी.**
4. **बहीण भावाच्या नात्यातला स्नेह वृद्धिंगत करणारा भाऊबीजेचा सण आज सर्वत्र उत्साहात साजरा.**
5. **जर्मनीतील हायलो ओपन बॅडमिंटन स्पर्धेत नागपूरच्या मालविका बन्सोड हिची अंतिम सामन्यात धडक.**

**अर्ज मागे**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा, उद्या शेवटचा दिवस असून, २८८ मतदारसंघांमध्ये, एकंदर सात हजार ६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. मराठवाड्यातल्या मतदारसंघांमध्ये, सर्वाधिक उमेदवार आहेत तर, कोकणात उमेदवारांची संख्या अतिशय मर्यादित आहे. नांदेड जिल्हयातल्या, भोकर विधानसभा मतदारसंघात, सर्वाधिक १४० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्याखालोखाल बीड जिल्हयात, माजलगाव मतदारसंघात, ९८ तर, बीडमध्ये ९० उमेदवारांचे अर्ज, वैध ठरले आहे. राज्यात महाड विधानसभा मतदारसंघात, सर्वात कमी म्हणजे फक्त पाच उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

**चंद्रशेखर बावनकुळे**

महायुतीचे 36 तर, महाविकास आघाडीचे 26 उमेदवार बंडखोरीच्या पावित्र्यात आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी आपापल्या पक्षातल्या बंडखोरांना शांत करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळ उद्या, अर्ज मागं घेण्यात आल्यानंतर राज्यातल्या प्रमुख पक्षांच्या जागा वाटपाचं चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान, भाजपाचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील असा विश्वास, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी, व्यक्त केला आहे. जे बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेणार नाहीत त्यांना, सहा वर्षांसाठी, पक्षातून निलंबित करू असा इशारा त्यांनी दिला. वर्धा जिल्हयातील आर्वी मतदारसंघातील आमदार दादाराव केचे यांनी, आपल्या विनंतीवरून बंडखोरी मागे घेतली. त्याचप्रमाणे, पक्षाचे इतर निष्ठावान कार्यकर्ते देखील, आपलं ऐकतील असं बावनकुळे म्हणाले -

***मी दादाराव केचेचंही आभार मानतो, दादाराव केचेंनी काल माननीय अमित भाई ची भेट घेतली, माझ्यासोबत भेट घेतली आणि दादाराव केचे नाराज झाले होते पण निष्ठेनी सांगितलं, मी जाईल आणि आमचा उमेदवार निवडून आणण्याकरिता माझा उमेदवार वापस***

*अर्ज करेल आणि त्यामुळं गोपाळ शेट्टी असेल, दादा केचे जी असतील, आमचे रविराज देशमुख आहे अमरावतीचे आमचे प्रभुदास भिलावेकर आहे असे लोकं आहे त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य दिलं पण ते उभे आहेत, मला वाटते ते विड्राल करतील.*

**रामदास आठवले**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री, रामदास आठवले यांच्या आदेशानुसार, रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जागा वाटपातील नाराजी बाजूला ठेवून विधानसभा निवडणूकीत भाजप महायुतीला विजयी करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्याचं आवाहन केलं आहे. तसंच राज्यभरात ज्या कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत; त्यांनी आपले अर्ज मागे घ्यावेत असं आवाहन रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी केलं आहे.

**मनोज जरांगे**

मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील नेते, मनोज जरांगे पाटील यांनी, विधानसभा निवडणुकीतील आपली भूमिका, स्पष्ट केली आहे. जिथे शक्य आहे तिथं, उमेदवार उभे करायचे आणि शक्य नसेल तिथं, आपल्या उद्दिष्टांशी सहमत नसलेल्या उमेदवारांच्या विरोधात मतदान करायचं, हे मुलतत्व असल्याचं, जरांगे यांनी स्पष्ट केलं. एस.सी.आणि एस.टी. समुदायाच्या उमेदवारांना, मराठा समाजाकडून पाठिंबा मिळविण्यासाठी, विशेष प्रयत्न करणार असल्याचं, त्यांनी सांगितलं. उमेदवारांकडून लिखित बांधिलकी घेतली जाईल आणि त्यांच्या कार्याची व्हिडिओग्राफी देखील केली जाईल. मात्र ही माहिती सार्वजनिक केली जाणार नाही असं त्यांनी जाहीर केलं.

**नाना पटोले**

राज्यातल्या कापूस शेतकऱ्यांचं हित लक्षात घेऊन, केंद्र सरकारनं कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून, हमीभावानं कापूस खरेदी करण्याचे निर्देश, भारतीय कापूस महामंडळाला द्यावेत अशी मागणी, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना, पत्राद्वारे केली आहे. कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असून, ४० लाखांपेक्षा जास्त शेतकरी, कापूस पिकवतात. तरीही २२ लाख गाठी कापसाची आयात झाल्याच्या बातम्यांमुळ, देशात कापसाच्या दरात मोठी घसरण होण्याची शक्यता आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विकल्या न गेलेल्या, अकरा लाख कापूस गाठी पडून आहेत असं, पटोले यांनी पत्रात म्हटलं आहे.

**खर्च तपासणीचे वेळापत्रक**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने खर्च निरीक्षक यांच्याशी चर्चा करून प्रत्येक उमेदवाराच्या खर्च नोंदवही तपासणीसाठी वेळापत्रक तयार करण्यात येत आहे. अमरावती जिल्हयातील मतदारसंघांची पहिली तपासणी 7 नोव्हेंबर, दुसरी तपासणी 11 नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी 15 नोव्हेंबर दुपारी 3 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत करण्यात येईल.

**आमदार हरिराम वरखडे**

आरमोरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार हरिराम वरखडे यांचं काल रात्री नागपुरातील एका खासगी रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झालं. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. आज दुपारी आरमोरी तालुक्यातील जोगीसाखरा या त्यांच्या मूळ गावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आलेत. हरिराम वरखडे हे १९९० च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या तिकिटावर आरमोरी विधानसभा मतदारसंघातून निवडून आले होते. पुढे १९९२ मध्ये त्यांनी छगन भुजबळ यांच्या समवेत काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

**भाऊबीज**

आज कार्तिक शुद्ध द्वितीया. हिंदू संस्कृतीत, यमद्वितीया नावानं ओळखला जाणारा हा दिवस, बहीण भावाच्या नात्यातला स्नेह अधिक वृद्धिंगत करणारा सण म्हणून सर्वत्र साजरा होतो. हा सण, देशाच्या वेगवेगळ्या भागात, भाई फोटा, भाईटीका, यमद्वितीया, भाऊबीज अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या सणामुळ, भावा बहिणींमधलं प्रेम अधिक घट्ट होईल असं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, बलिप्रतिपदा अर्थात दिवाळी पाडवा काल साजरा झाला. हा दिवस साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक मानला जातो. विक्रम संवत २०८१ला कालपासून प्रारंभ झाला. देशाच्या अनेक भागात हा नववर्षाचा प्रारंभ मानला जातो.

**केदारनाथ धाम**

प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या, केदारनाथ धाम मंदीराचे दरवाजे, आज विधिवत बंद करण्यात आले. हिवाळा ऋतुमुळ, भाऊबीजेचा मुहुर्त साधत, सकाळी साडेआठ वाजता दरवाजे बंद झाले. उत्तरकाशीतल्या यमुनोत्री धाम मंदारीचे, दरवाजेही, आज दुपारी सव्वा बारा वाजता विधिवत बंद केले गेले.

**मालविका बनसोड बॅडमिंटन**

जर्मनीत सुरु असलेल्या हायलो ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरी स्पर्धेत, भारताच्या आणि मुळच्या नागपूरच्या, मालविका बन्सोड हिनं काल उपांत्य फेरीत, डॅनिश शटलर, ज्युली दावल जेकोबसेनचा, 23-21, 21-18 असा पराभव करत, या स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. जागतिक क्रमवारीत, ३४व्या क्रमांकावर असलेल्या मालविका पहिल्या गेममध्ये, सहाव्या मानांकित, ज्युली दावल जॅकोबसेनविरुद्ध १३-७ अशी पिछाडीवर होती. पण दुस-या गेममध्ये, तिनं गेट-गो मधून, आक्रमक खेळी करत, 15-7 अशी आघाडी घेतली. आज रात्री विजेतेपदाच्या लढतीत मालविकाचा सामना सातव्या मानांकित डेन्मार्कच्या मिया ब्लिचफेल्डशी होईल.

**कसोटी क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात, वानखेडे मैदानावर झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात, न्यूझीलंडनं भारताचा २५ धावांनी पराभव केला आणि मालिका ३-० अशी जिंकली. आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, सकाळच्या सत्रात, न्यूझीलंडचा दुसरा डाव केवळ, १४ चेंडूत तीन धावांची भर घालून, १७४ धावांवर आटोपला. मात्र पहिल्या डावातल्या २८ धावांच्या आघाडीमुळ, भारतासमोर विजयासाठी १४७ धावांचं आव्हान होतं. प्रत्युत्तरात भारताचा दुसरा डाव केवळ १२१ धावांत आटोपला. न्यूझीलंडच्या एजाज पटेल यानं, दुसऱ्या डावात भारताचे सहा गडी बाद करत सामन्यात एकूण ११ बळी टिपले. न्यूझीलंडनं, तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत याआधीच २-० अशी आघाडी घेत मालिका जिंकली होती. आजच्या पराभवासोबत भारतीय क्रिकेट संघानं तब्बल बारा वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावली आहे. सन २००० नंतर पहिल्यांदा भारतीय संघाला देशात झालेल्या कसोटी मालिकेतला एकही सामना जिंकला आलेला नाही.

**अपघात**

नंदुरबार जिल्ह्यात, भरधाव जीपनं दिलेल्या धडकेत, पाच जणांचा मृत्यू झाला. काल रात्री उशीरा, नंदुरबार ते धानोरा रस्त्यावर, लोय पिंपळोद गावाजवळ, हा अपघात झाला. रस्त्याच्या कडेला, नादुरुस्त दुचाकीजवळ उभ्या असलेल्यांना, भरधाव गाडीनं धडक दिली. यात १२ ते ४० वर्ष वयोगटातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. या अपघातात एक जण गंभीर जखमी असून, त्याला नंदुरबार इथं, जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती, आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

'आढावा विधानसभा मतदारसंघांचा'

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज बुलडाणा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**धनगर समाज**

धनगर समाजाच्या, यशवंत सेनेनं, येत्या विधानसभा निवडणुकीत, शिवसेनेला पाठींबा जाहीर केला आहे. या संघटनेचे अध्यक्ष, माधव गडदे यांनी, काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, भेट घेतल्यानंतर ही भूमिका, जाहीर केली आहे.

*****